## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ४१४१ / २०२३ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| निखिल संतोष नाटकर | सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती बारामती ता.बारामती जि.पुणे | गटविकास अधिकारी, पंचायत समिती बारामती ता.बारामती जि.पुणे |

**( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.११.०७.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारे उत्तर देऊन माहिती नाकारली, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान तथा तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि त्यांचे लेखी म्हणणे आयोगास प्राप्त आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.०६.०३.२०२३ च्या माहिती अर्जात दि.०६.०३.२०२३ रोजीचे वेळ दु.१.०० ते १.२० या वेळेतील प्रथम अपिलीय अधिकारी श्री.डी.डी.खंडाळे यांच्या केबिनचे सीसीटीव्ही फूटेजची माहिती मागितलेली आहे.

अपिलार्थी यांनी दि.१८.०६.२०२५ रोजी त्यांचे लेखी म्हणणे आयोगास खालीलप्रमाणे सादर केले आहे.

जोडपत्र 'अ' दि.०६/०३/२०२३ द्वारे मागणी केलेली माहिती ही पूर्ण दिवसाची न मागता केवळ माझ्या प्रकरणातील संबंधित वेळेतील माहिती मी मागितली आहे.जनमाहिती अधिकारी यांनी मला जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे.

मागितलेली माहिती ही अत्यंत महत्वाची असून या दिवशी माझी संबंधित ठिकाणी प्रथम अपील सुनावणी ठेवण्यात आली होती. या सुनावणीवेळी जनमाहिती अधिकारी हे गैरहजर असतांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांची गैरहजेरी नोंदवण्यास नकार दिला, स्वतः जनमाहिती अधिकारी यांची बाजू घेवून युक्तिवाद केला तसेच या बाबत आक्षेप घेताच माझ्याशी गैरवर्तन केलेले असल्याने मी याबाबत कायदेशीर तक्रार केली असून मागितलेल्या वेळेतील CCTV फुटेज मिळणे माझ्यासाठी अत्यंत गरजेचे आहे.

प्रथम अपील सुनावणीवेळी पंचायत समिती बारामती येथे माझ्यासोबत झालेला हा प्रकार म्हणजे एक प्रकारचा भ्रष्टाचार असून मागितलेली माहिती ही कोणाचीही खाजगी मालकीची नाही, ती सार्वजनिक कार्यालयातील असतांना माझ्यासोबत झालेला अन्याय दडपण्याच्या हेतूने मला मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे.

शासन परिपत्रक क्र. कैमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२११/६ (मा.अ) मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १० जून २००८ चे पालन जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी करून देय असलेली माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना जाणीवपूर्वक माहितीचा अधिकार कायद्याचा भंग करून मागितलेली माहिती कलम ८ (त्र) अन्वये नाकारल्याचे मला कळवले आहे. मात्र मी मा. आयोगाच्या निदर्शनास आणून देतो की, सदर माहिती ही शासकीय कार्यालयाशी संबंधित असून एक नागरिक म्हणून शासकीय कार्यालयात माझ्या सोबत करण्यात आलेली गैरवर्तणूकीबाबत न्याय मिळण्याकामी मागितलेली माहिती माझ्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. तरी CCTV फुटेज मधील बाकीचा भाग वगळून केवळ माझ्या प्रकरणाशी संबंधित माहिती मला तात्काळ मिळावी.

मला मागितलेली माहिती देण्यास जाणीवपूर्वक दडपणाऱ्या जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकारातील कलम २० (२) नुसार कारवाई करण्यात यावी. तसेच जाणीवपूर्वक प्रथम अपील सुनावणीत माहिती नाकारणाऱ्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर कलम २०(१) अन्वये कारवाई करण्यात यावी.

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीला दि.२४.०३.२०२३ च्या पत्राने माहिती अधिनियम कलम ८ (त्र) नुसार व्यापक जनहित साध्य होत नसलेने माहिती नाकारल्याचे कळविले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.०५.०६.२०२३ रोजी अपिल निकाली काढले असा निर्णय पारित केला आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला दि.२४.०३.२०२३ च्या पत्राने उत्तर दिले आहे.प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमक्ष सांगितले की, त्यांचेकडे सीसीटीव्ही ची स्टोरेज कपॅसीटी कमी असून सदर तारखेचे फुटेज उपलब्ध नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती बारामती यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली माहिती /वस्तुस्थितीदर्शक उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत अधिनियमाच्या कलम ७(६) अन्वये अपिलार्थीस विनामुल्य अपलब्ध करून द्यावे.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

जावक क्र. ४१४१ / २०२३ / पुणे 9119/2025

दिनांक - 2/9/2025